N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** मुरगुड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0165 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**06/06/2024 19:48

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
**Date From (दिनांक पासून):** 27/12/2023
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date To ( दिनांक पर्यंत):** 27/12/2023
**Time From (वेळेपासून):** 13:17 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:08 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 06/06/2024 **Time (वेळ):** 19:27 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 019

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/06/2024 19:27 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 14 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मुगळी, ,ताकागल

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** प्रविण संतु पाटील

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** संतु पाटील

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1977

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| **S.No. (अ.क्र.)** | **ID Type (ओळखपत्राचा प्रकार)** | **ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)** |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Address Type (पत्याचा प्रकार)** | **Address (पत्ता)** |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मुगळी, ता कागल,मुरगुड,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मुगळी, ता कागल,मुरगुड,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9158062133

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Name (नाव)** | **Alias (उर्फनाव)** | **Relative's Name (नातेवाईकाचे नाव)** | **Present Address (वर्तमान पता)** |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रदिप अंनत कांबळे | | वडील का नाम : अंनत कांबळे | 1. मुरगुड, ,ताकागल,,मुरगुड, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | गणपती रघुनाथ शेळके | | वडील का नाम : रघुनाथ शेळके | 1. जैन्याळ, ,ताकागल,मुरगुड, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| **S.No. (अ.क्र.)** | **Property Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (वर्णन)** | **Value(In Rs/-) (मुल्य (रु.** |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
| --- | --- |

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 06/06/2024

मी प्रविण संतु पाटील, वय -47 वर्षे, व्यवसाय - शेती, रा. मुगळी, ता. कागल, जि. कोल्हापूर मो. नं. 9158062133 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 26/12/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथील पोलीस उपअधीक्षक श्री.सरदार नाळे यांना फोन करून माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सांगितली की, माझी वडीलार्जीत शेतजमीन मुगळी, ता. कागल येथे शेती गट नंबर 351 मध्ये आहे. त्यानंतर मी सदर जमीनीचे हक्कसोडपत्र माझी आई व भाऊ यांचेकडुन दिनांक 29/05/2023 रोजी करून घेतले होते. त्यानंतर सदर हक्कसोडपत्राप्रमाणे गट नंबर 351 मधील शेतजमीनीच्या डायरी उता-यावर माझे नाव नोंद होणेसाठी मी तलाठी कार्यालयात कागदपत्रे दिली होती. समाईक शेतजमीन असताना त्यावर कर्ज असलेमुळे सदर कर्ज भरून बोजा कमी होणे आवश्यक असलेबाबत मला आमचे गावचे तलाठी कांबळे यांनी सांगितल्याने मी सदरचे कर्ज भरले त्याकरीता मंडल अधिकारी लिंगनुर, ता. कागल येथे मंडल अधिकारी यांचेसमोर दिनांक 06/07/2023 रोजी सुनावणी झाली होती. त्यानंतर त्यांनी शेतजमीन वरील बोजा कमी झाला असुन माझे नावावर दस्ताप्रमाणे जमीन नोंद करून डायरी उतारा करणेकरीता आदेश दिला होता. तो आदेश मुगळी तलाठी यांचेकडे आला असुन माझे नावावर डायरी उतारा घातला आहे का हे पाहणेसाठी मी तलाठी कार्यालयात दिनांक 22/11/2023 रोजी सकाळी 11.30 वा.चे सुमारास गेलो त्यावेळी तेथे तलाठी यांना भेटुन माझे कामाबाबत बोललो त्यावेळी त्यांनी प्रकरण पाहुन सांगतो असे सांगितले. त्यावेळी मला तेथे तलाठी कार्यालयात काम करणारा गणेश शेळके हे मला भेटले व त्यांनी मला डायरी उतारा घालुन देणेसाठी तलाठी कांबळे यांना 5,000/- रूपये दयावे लागतील नाही दिलेतर काम होणार नाही असे सांगितले त्यावेळी मी त्यांना पैशांची जुळणा करून भेटतो असे म्हणुन तक्रार सांगुन मी दि.27/12/2023 रोजी तलाठी कांबळे व खाजगी इसम गणेश शेळके यांना भेटण्यास जाणार असल्याचे सांगुन तुम्ही मुगळी गावी यावे असे सांगितले. त्यावेळी नाळे साहेबांनी त्यांचे आॅफिसमधील पोलीस निरीक्षक बापु साळुंके हे तुम्हाला दि.27/12/2023 रोजी भेटतील असे सांगितले.

त्यानंतर मी व सांळुके साहेब एकमेकांचे संपर्कात होतो. साळुके साहेब यांनी ते मुगळी फाटा येथे आलो असल्याचे सांगितले. तेथे जावुन मी त्यांना भेटलो त्यावेळी त्यांनी त्यांची तसेच त्यांचे सोबत असले पंच व स्टाफ यांची ओळख करून दिली. त्यानंतर मी साळुंके साहेब यांना माझी तक्रार सांगुन, तक्रारी अर्ज त्यांचेकडे दिला असता त्यांनी व पंचासमक्ष सदरचा माझा तक्रारी अर्ज वाचून त्यावरती सहया केल्या त्यानंतर साळुंके साहेबांनी पुढील कारवाई येथुनच करण्याचे आहे असे सांगुन त्यांच्याकडील व्हाईस रेकाॅर्डरची संपुर्ण माहिती आम्हाला देवुन तलाठी प्रदिप कांबळे व खाजगी इसम गणेश शेळके यांच्या लाच मागणीचे अनुषगाने पडताळणी बाबत आवश्यक सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकाॅर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच न.01 यांना त्याना भेटणेकरीता पाठविले. मी तलाठी कार्यालय मुगळी येथे गेलो त्यावेळी मला प्रथम गणेश शेळके भेटला आमचेत माझे कामाविषयी बोलणे झाले त्यावेळी त्याने तलाठी साहेबांनी सांगितलेप्रमाणे 5,000/- रूपये दे... असे म्हणुन माझेकडे पाच हजार रूपयांची मागणी केली त्यावेळी मी गणेश याला कायतरी कमी करा... असे म्हणालो त्यावेळी गणेश यांनी नाही ओ मला तेवढेच सांगितले आहे... असे म्हणाला त्यावेळी मी त्यांना आपण तलाठी कांबळे यांना भेटुया असे म्हणालो त्यानंतर मी व प्रविण असे तलाठी कांबळे यांना भेटलो त्यावेळी मी कांबळे यांना गणा काय म्हणतोय बघा... असे म्हणालो त्यावेळी तलाठी कांबळे काय म्हणतोय बाबा.... असे म्हणाले. त्यावेळी गणेश याने तलाठी कांबळे यांना प्रविण म्हणतोय काय तरी कमी करा...असे म्हणाला त्यावेळी तलाठी कांबळे यांनी मला सांगितलय तुला....असे म्हणुन त्यानी माझेकडे एक कागद देवुन यावरती माझे भावांच्या सहया घेवुन ये असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना माझं काम तेवढं लवकर करून दया असे म्हणालो त्यावेळी तलाठी तु सहया घेवुन ये जा असे म्हणाले. त्यावेळी तलाठी यांना बोला की आकडा असे म्हणालो त्यावेळी गणेश याने सहया घेवुन या जावा असे म्हणाले त्यावेळी तलाठी

कांबळे यांनी कॅलक्युलेटरवरती 5000 असा आकडा मला दाखविला. त्यावेळी गणेश याने ये गा इकडं काय ते सांग... असे म्हणाला त्यावेळी मी व्हयं साहेब... असे म्हणालो त्यावेळी मला तलाठी कांबळे यांचे समोरच गणेश याने मला तु जा गप्प ते तुला सांगितले तेवढं कर जा काही कमी जास्त करू नकोस... असे म्हणाले. त्यानंतर आमचेत माझे कामाचे अनुषंगाने बोलणे झाले त्यावेळी त्यांनी मला सहया घेवुन या जावा असे सांगितले. त्यानंतर मी व पंच नं. 01 तेथुन साहेब थांबलेल्या ठिकाणी परत येवुन साहेबांना सर्व हकीकत सांगितली.

त्यानंतर मी साहेबांचे सुचनेवरून तलाठी कांबळे यांनी मला जो कागद दिला होता त्यावर माझे भावाच्या सहया घेवुन परत आलो. त्यावेळी पुन्हा तलाठी कांबळे यांचे लाच मागणीबाबत पुन्हा पडताळणी करण्याचे ठरलेने मला व पंच नं.1 यांना परत तलाठी कार्यालय येथे पाठवुन दिले. तेथे मी तलाठी कार्यालयात जावुन तलाठी कांबळे यांना भेटुन कामाबाबत बोललो त्यावेळी मी तलाठी कांबळे यांना ते नव्हं मघाशी सांगितलेले पाच हजार कुणाकडं दयायचं तुमच्याकडं दयायचं का.... असे विचारले त्यावेळी कांबळे यांनी सर्कलांच्याकडे दया... असे म्हणाले त्यावेळी मी त्यांना माझे कडुन घेतील का... असे विचारले त्यावेळी कांबळे यांनी घेतील... असे म्हणाले. त्यावेळी मी ठिक आहे चर्चा करतो सर्कल कडे... असे म्हणुन मी व पंच नं.01 तेथुन साहेब थांबलेल्या ठिकाणी परत येवुन साहेबांना सर्व हकीकत सांगितली.

त्यानंतर साळुंके साहेब यांनी लिंगनुर सर्कल यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी बाबत आवश्यक सुचना दिल्या. त्यानंतर मी व पंच नं.01 असे लिगंनुर मंडल अधिकारी कार्यालयात गेलो त्यावेळी ते कार्यालय बंद होते. त्यानंतर साळुंके साहेब यांचे सुचनेवरून मी गणेश शेळके याचा मोबाईल नं. 9823290921 वर फोन केला त्यावेळी आमचे माझे कामाविषयी पुन्हा बोलणे झाले त्यावेळी मी त्याला तलाठी साहेब म्हणत्यात सर्कल साहेबांची गाठ घ्या सर्कल साहेब जाग्यावर नाहीत काम तुमच्याकडे आहे का त्यांच्याकडे... असे म्हणालो त्यावेळी गणेश याने तसच सांगणार साहेब तुला, तुला विश्वास नाही ओ आमच्यावर, आम्हीच त्यांना देणार रे इकडुन... असे म्हणाला त्यावेळी मी कधी दयायचं ते आता कधी भेटुया आपण... असे म्हणालो त्यावेळी कधी बी दे की... असे म्हणाले. त्यावेळी मी त्याला तलाठी साहेब आहे का.... असे विचारले त्यावेळी त्याने तलाठी गेले असावेत उदया कधी येणार आहेत ते उदया समजेल, तुझे काम करून दयायची जबाबदारी आमची.... असे गणेश म्हणाला. त्यामुळे सुरू असलेली सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करून दिनांक 28/12/2024 रोजी पुन्हा कारवाई करणेबाबत साळुंके साहेबांनी सुचना दिल्या.

दिनांक 28/12/2023 रोजी साळुंके साहेबांनी लाच मागणीचे अनुषंगाने आणखीन पडताळणी करणेकरीता मला व पंच नं. 1 यांना आवश्यक सुचना देवुन तलाठी कांबळे यांची भेट घेणेकरीता पाठविले. मी तलाठी कार्यालयात जावुन तलाठी कांबळे यांना भेटलो व त्यांना लिंगनुर सर्कल यांना भेटणेस गेलो होतो परंतु त्यांची भेट झाली नसल्याचे सांगितले. त्यावेळी तलाठी यांना सर्कल रजेवर असल्याचे सांगितले त्यावेळी मी तलाठी यांना पाच हजाराचे काय करायचे कुणाकडे दयायचे... असे विचारले त्यावेळी तलाठी यांनी सर्कल उदया परवा येणार आहेत त्यावेळी काम करूया... असे म्हणाले त्यानंतर मी व पंच तेथुन साहेब थांबलेल्या ठिकाणी येवुन घडलेली हकीकत सांगितली. त्यामुळे सुरु असलेली पडताळणी कारवाई स्थगित करून सर्कल मॅडम रजेवरून हजर झालेनंतर पुढील कारवाई करणेबाबत साळुंके साहेबांनी सुचना दिल्या.

दिनांक 23/01/2024 रोजी लिंगनुर सर्कल लोकरे मॅडम यांची लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी करणेकरीता मला व पंच नं. 1 यांना साळुंके साहेबांनी आवश्यक सुचना देवुन लिंगनुर सर्कल मॅडम यांची भेट घेणेकरीता पाठविले. त्यावेळी माझी व सर्कल मॅडम यांची भेट झाली त्यावेळी मी त्यांना तलाठी कांबळे यांनी तुमच्याकडे 5000/-रू देण्यास सांगीतले आहे त्यानंतर माझे कामाविषयी बोलणे झाले परंतु लाच मागणीच्या अनुषंगाने उपयुक्त बोलणे झाले नाही. आम्ही परत येवुन साळुंके साहेबांना घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर साळुंके साहेबांनी पुन्हा सर्कल लोकरे मॅडम यांच्या लाचेच्या मागणीची पडताळणी करणे आवश्यक असल्याचे सांगुन मला व पंच नं 1 यांना सर्कल यांचेकडे पाठवुन दिले असता आम्ही तेथे जावुन माहीती घेतली असता सर्कल मॅडम ह्या कार्यालयातुन निघुन गेल्याचे समजले त्यामुळे सुरू असलेली कारवाई तात्पुरती स्थगित करून सर्कल आलेनंतर पुढील कारवाई करणेबाबत साळुंके साहेबांनी सुचना दिल्या.

त्यानंतर मी काही दिवसानी साळुंके साहेब यांना लिंगनुर सर्कल यांची बदली झाली असल्याचे सांगितले. त्यावेळी त्यांनी पुन्हा तलाठी कांबळे यांना भेटुन त्यांनी केले लाच रक्कमेबाबत त्यांना विचारून घेणेबाबत त्यांची पुन्हा पडताळणी कारवाई करणे आवश्यक असल्याने दिनांक 27/02/2024 रोजी पडताळणी कारवाई केली असता तलाठी कांबळे हे ऑफीसमध्ये नसलेने सदरची सापळा कारवाई तात्पुरती स्थगीत केली.

दिनांक 04/03/2024 रोजी तलाठी कांबळे यांची पडताळणी करण्याची असल्याचे सांगुन योग्य त्या सुचना देवुन मला व पंच नं. 1 यांना तलाठी कांबळे यांची भेट घेणेकरीता पाठविले. मी तलाठी कांबळे यांना भेटुन त्यांना मी

सर्कल मॅडम यांना भेटुन आल्याचे सांगितले त्यावेळी सर्कल लोकरे मॅडम या काही बोलल्या नाही फक्त काम करूया या असे सांगितले. त्यावेळी मी तलाठी कांबळे यांना तुमच्या कामाचे काय... याबाबत विचारणा केली असता तलाठी कांबळे यांनी सर्कलनाच भेटायला सांगितले होते... असे म्हणाले. त्यानंतर आमच्यात कामाबाबत बोलणे होवुन मी व पंच परत येवुन साळुंके साहेबांना भेटुन त्यांना घडलेली हकीकत सांगत असतानाच मला गणेश याने फोन करून बोलविल्याने साळुंके साहेबांनी मला पुन्हा तलाठी कांबळे व गणेश यांची पडताळणी करण्याचे ठरवुन आम्हाला त्यांना भेटण्यास पाठविले. मी तलाठी कार्यालयात जावुन कांबळे यांना भेटलो. त्यावेळी आमचेत कामाबाबत चर्चा होवुन त्यांनी माझेकडे माझा सातबारा उतारा दिला तेथुन मी परत येवुन साळुंके साहेबांना भेटुन घेडलेली हकीकत सांगितली. सदर भेटीवेळी त्यांनी यापुर्वी माझेकडे मागणी केलेले पैसे नेमके कोणाकडे दयावे याची खातरजमा करण्याकरीता पुन्हा पंचासह तलाठी कांबळे व गणेश यांची भेट घेण्यास रवाना केले असता भेटी दरम्यान तलाठी कांबळे यांनी मला सर्कल मॅडम यांना पैशाचे का बोलला म्हणुन मला बोलु लागले व सारवा सारव करू लागले त्यानंतर मी परत येवुन घडलेली हकीकत साळंुके साहेबांना सांगितली. त्यानंतर साळुंके साहेबांनी मला पुन्हा तलाठी कांबळे अथवा गणेश शेळके हे यापुर्वी केलेल्या 5,000/- रू लाचेची मागणी करतील या बाबत खात्री आहे काय असे विचारले असता त्यावेळी मी त्यांना तलाठी यांच्या आताच्या बोलण्यावरून तलाठी कांबळे अथवा खाजगी इसम गणेश शेळके हे माझेकडे यापुर्वी मागणी केलेले 5000/-रू लाचेची सध्या मागणी करतील असे वाटत नाही असे सांगितले. त्यामुळे सदरची चालु पडताळणी कारवाई साळुंके साहेबांनी स्थगित केली. त्यानंतर मी सदरची कारवाई थांबवणेबाबत साळुंके साहेबांकडे जबाब दिला.

तरी माझे मुगळी, ता. कागल येथील शेती गट नंबर 351 मधील शेतजमीन हक्कसोडपत्राप्रमाणे डायरी उतायावर माझे नाव नोंद होवुन सातबारा उतारा देणेकरीता मुगळी येथील तलाठी कांबळे यांचेकरीता खाजगी इसम गणेश याने माझेकडे अप्रामाणिकपणे 5,000/-रूपये मागणी केली तसेच तलाठी कांबळे यांनी गणेश याने माझेकडे मागणी केलेले 5,000/-रूपये मला बेकायदेशिरपणे लिंगनुर सर्कल मॅडम यांचेकडे देणेस सांगितले होते. त्यानंतर सदर कारवाईमध्ये आपण तलाठी कांबळे व खाजगी इसम गणेश षेळके यांना ताब्यात घेतलेनंतर त्यांची नावे 1) प्रदिप अनंत कांबळे वय - 32 वर्षे, तलाठी, सज्जा जैन्याळ - मुगळी ता.कागल, जि.कोल्हापूर वर्ग - 3, रा. रोहीदास गल्ली, श्री जगन्नाथ पुजारी यांचे घरी भाडयाने मुरगुड, ता.कागल, जि.कोल्हापूर मुळ रा.तरसंबळे, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर, 2) गणपती रघुनाथ शेळके, वय - 46, रा.जैन्याळ, ता.कागल, जि.कोल्हापूर अशी असल्याचे समजले आहे. तरी तलाठी कांबळे व खाजगी इसम गणेश शेळके यांनी माझेकडे लाच मागणी केली आहे म्हणुन माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगितलेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली असता ती खरी व बरोबर आहे.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

shivaji dhondiram kare(I (Inspector)) / DGPSDKM8605 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

प्रविण संतू पाटील

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-यांची स्वाक्षरी)

**Name**(नाव): shivaji dhondiram ka
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): DGPSDKM8605